**Ref:** MGL/CS/SE/2019/275 **Date:** August 19, 2019

To,

| | |
|---|---|
| **Head, Listing Compliance Department**<br>**BSE Limited**<br>P. J. Towers,<br>Dalal Street,<br>Mumbai - 400 001<br>**Scrip Code/Symbol: 539957; MGL** | **Head, Listing Compliance Department**<br>**National Stock Exchange of India Ltd**<br>Exchange Plaza, Bandra –Kurla Complex,<br>Bandra (East),<br>Mumbai - 400051<br>**Script Symbol: MGL** |

**Sub: Newspaper publication of Notice of 24th Annual General Meeting, Remote E-Voting Information and Book Closure.**

Dear Sir/Madam,

Please find attached herewith the copy of publication of Notice published in the newspapers viz. Financial Express (English edition) and Loksatta (Marathi edition), intimating about the Twenty Fourth Annual General Meeting of the Company, Remote E-Voting Information and Book Closure.

You are requested to take the above information on your records and disseminate the same on your website.

For **Mahanagar Gas Limited**

MAHANAGAR GAS LIMITED MUMBAI

**Arvind Kumar**
**Company Secretary and Compliance Officer**

Encl.: As above

लोकसत्ता

WWW.LOKSATTA.COM

मुंबई, शनिवार, १७ ऑगस्ट २०१९ ★ ५

MAHANAGAR GAS

**महानगर गॅस लिमिटेड**

सीआयएन: एल४०२००एमएच१९९५पीएलसी०८८१३३
नोंदणीकृत कार्यालय: एमजीएल हाऊस, ब्लॉक जी-३३, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे (पूर्व), मुंबई ४०००५१
दूरध्वनी: +९१ २२ ६६७८५००० • फॅक्स: +९१ २२ २६५२८९२५
ई-मेल: investorrelations@mahanagargas.com
संकेतस्थळ: www.mahanagargas.com

25th ECO-FRIENDLY YEAR

# २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, दूरस्थ ई-मतदान माहिती व पुस्तिका बंद असणे

याद्वारा **सूचना** देण्यात येते की :

चोविसाव्या एजीएमच्या सूचनेमध्ये सविस्तर दिल्यानुसार सामान्य व विशेष कामकाज चालविण्याकरिता कंपनीच्या सदस्यांची **चोविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम)** सोमवार ०९ सप्टेंबर २०१९ रोजी स. ११.०० वा 'आयईएस मणीक सभागृह' ऑडिटोरियम, विश्वकर्मा एम. डी. लोटलीकर विद्या संकुल, लीलावती हॉस्पिटलसमोर, बांद्रा रिक्लेमेशन, बांद्रा (प.), मुंबई-४०० ०५० येथे घेण्यात येणार आहे.

अटेंडन्स स्लिप व प्रॉक्सी फॉर्मसमवेत कंपनीची २४ वी एजीएम बोलाविणारी सूचना आणि ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता कंपनीचा वार्षिक अहवाल सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने आणि ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत आहेत, अशा सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आले आहेत. एजीएम सूचनेची प्रत **www.mahanagargas.com** या कंपनीच्या वेबसाइटवर आणि **www.evoting.nsdl.com** या एनएसडीएलच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. वित्तीय वर्ष २०१८-१९ करिता वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहे.

**ई-मतदान** : सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ आणि, सुधारित केल्यानुसार, कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ च्या रुल २० यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ च्या तरतुदींच्या अनुसार कंपनी तिच्या सदस्यांना दूरस्थ ई-मतदानाच्या सुविधेची तरतूद करून देत आहे. ज्या सदस्यांकडे सोमवार, ०२ सप्टेंबर, २०१९ या कट-ऑफ तारखेप्रमाणे प्रत्यक्ष प्रपत्रात किंवा डिमटेरिअलाइज्ड प्रपत्रात भाग आहेत ते एजीएमच्या ठिकाणाखेरीज अन्य ठिकाणावरून ('दूरस्थ ई-मतदान') नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या (एनएसडीएल) इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीद्वारे एजीएमच्या सूचनेमध्ये सविस्तरपणे दिल्यानुसार कामकाजावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांचे मतदान करू शकतील.

सर्व सदस्यांना कळविण्यात येते की :

१. एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज दूरस्थ ई-मतदानाद्वारा चालविण्यात येईल.
२. दूरस्थ ई-मतदान शुक्रवार, ०६ सप्टेंबर २०१९ (स. ९.०० वा. भाप्रवे) रोजी सुरू होईल.
३. दूरस्थ ई-मतदान रविवार, ०८ सप्टेंबर २०१९ (सायं. ५.०० वा. भाप्रवे) रोजी संपेल.
४. दूरस्थ ई-मतदानाची पात्रता निश्चित करण्याकरिता कट-ऑफ तारीख सोमवार, ०२ सप्टेंबर २०१९ ही आहे.
५. कोणतीही व्यक्ती एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचा सदस्य बनते आणि कंपनीचे भाग प्राप्त करते आणि सोमवार ०२ सप्टेंबर २०१९ या कट-ऑफ तारखेप्रमाणे तिच्याजवळ भाग आहेत ती **evoting@nsdl.co.in** यावर ई-मेल पाठवून लॉग-इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. तथापि, जर व्यक्ती आधीच दूरस्थ ई-मतदानाकरिता एनएसडीएलकडे नोंदणीकृत आहे, तर ती तिचे मतदान करण्याकरिता विद्यमान युजर आयडी व पासवर्डचा वापर करू शकेल.
६. मतदानास पात्र असलेल्या सदस्यांनी नोंद घ्यावी की, : **ए)** दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया रविवार, ०८ सप्टेंबर २०१९ रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) नंतर एनएसडीएलद्वारा निःसमर्थ करण्यात येईल आणि सदस्याद्वारा ठरावावर एकदा मतदान केल्यानंतर त्यास तद्नंतर ते बदलण्यास अनुमती दिली जाणार नाही; **बी)** पोल/ टॅबलेटद्वारा मतदान करण्याची सुविधा एजीएममध्ये उपलब्ध करून देण्यात येईल; **सी)** ज्या सदस्यांनी एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारा त्यांचे मतदान केले आहे ते एजीएममध्येसुद्धा उपस्थित राहू शकतील; परंतु ते पुन्हा मतदान करू शकणार नाहीत; आणि **डी)** ज्या व्यक्तीचे नाव सदस्यांच्या नोंदवहीत किंवा कट-ऑफ तारखेनुसार डिपॉझिटरिजद्वारा ठेवण्यात आलेल्या लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत अभिलिखित आहे तीच केवळ दूरस्थ ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ तसेच, इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारा सभेमध्ये मतदान करणे किंवा एजीएम स्थळी तरतूद केलेल्या पोल पेपर/ टॅबलेट सुविधेचा लाभ घेऊ शकेल.
७. कंपनीने ई-मतदान प्रक्रियेची छाननी व एजीएममधील मतदान स्वच्छ व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याकरिता परिनिरीक्षक म्हणून श्री. ललित के. जैन, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी, यांची नेमणूक केली आहे.
८. सदस्यास कोणतीही शंका असल्यास, सदस्यांकरिता असलेल्या फ्रिक्वेन्टली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यू'ज) **www.evoting.nsdl.com** येथील डाऊनलोड्स सेक्शनवर त्यांच्याकरिता उपलब्ध असलेले दूरस्थ ई-मतदान युजर मॅन्युअल पाहू शकतील किंवा टोल-फ्री क्र.: १८००२२२९९० यावर कॉल करू शकतील किंवा **evoting@nsdl.co.in** येथे विनंती पाठवू शकतील किंवा सदस्य खालील ठिकाणीसुद्धा संपर्क साधू शकतील:

**पुस्तिका बंद असणे बाबत :** सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४२ आणि, सुधारित केल्यानुसार, कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ च्या रुल १० यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ च्या अनुसार याद्वारा, अशीसुद्धा सूचना देण्यात येते की, सदस्यांची नोंदवही आणि कंपनीची भाग हस्तांतरण पुस्तिका कंपनीची २४वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि वित्तीय वर्ष २०१८-१९ करिता लाभांशाची पात्रता निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ मंगळवार, ३ सप्टेंबर २०१९ पासून ते सोमवार, ०९ सप्टेंबर २०१९ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद ठेवण्यात येईल.

ज्या सदस्यांनी अजून त्यांचे ई-मेल आयडीज नोंदणीकृत केलेले नाहीत किंवा ज्यांना त्यांच्या ई-मेल आयडीजमध्ये बदल करावयाचा आहे त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वेळोवेळी कंपनीद्वारा पाठविलेले वार्षिक अहवाल, सूचना, इ. समाविष्ट इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सर्व पत्रव्यवहार जेणे करून स्वीकारले जातील याकरिता त्यांच्या डीपीसह त्यांचा ई-मेल आयडी वैध ठेवावा.

**महानगर गॅस लिमिटेड**करिता
स्वाक्षरी/-
**अरविंद कुमार**
कंपनी सेक्रेटरी व कॉम्प्लाएन्स ऑफिसर

**तारीख** : १६ ऑगस्ट २०१९
**स्थळ** : मुंबई